## प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बुलढाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | **आरोपी श्री. उमेश पंडीतराव सानप, वय ३९ वर्षे, पद भुकरमापक, उपअधिक्षक तालुका भुमी अभिलेख कार्यालय लोणार, ता.लोणार जि.बुलढाणा रा. खटकेश्वरनगर, लोणार, ता.लोणार जि.बुलढाणा** |
| लाच मागणी | ८०,०००/– रुपये |
| लाच स्विकारली | ६००००/– रुपये |
| घटनास्थळ | माऊली गजानन हॉटेल, बसस्थानक, लोणार ता. लोणार जि. बुलढाणा |
| घटना तारीख | १७.०१.२०२५ रोजी |

**थोडक्यात हकीकत :–**यातील तक्रारदार यांचे प्लॉटची आखणी व मोजनी लवकर करण्यासाठी लोकसेवक हे ८०,०००/– रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बुलडाणा घटकाकडे प्राप्त झाली होती.

त्यानुसार दिनांक १७.०१.२०२५ रोजी लाचमागणी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता, लोकसेवक श्री.उमेश सानप, पद भुकरमापक, उपअधिक्षक तालुका भुमी अभिलेख कार्यालय लोणार यांनी तक्रारदार यांना ८०,०००/– रुपये लाचेची मागणी करुन लाचेचा पहीला हप्ता ६०,०००/– रुपये स्विकारण्यास संमती दर्शवुन उर्वरीत २०,०००/– रुपये काम झाल्यानंतर स्विकारण्याचे मान्य केले. आयोजीत सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक श्री.उमेश सानप पद भुकरमापक यांना पंचासमक्ष लाचेचा पहीला हप्ता ६०,०००/– रुपये स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले. लोकसेवक यांना ताब्यात घेवुन त्यांचेविरुद्ध लाच मागणीबाबत पोलीस स्टेशन लोणार येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालु आहे.

**सदर कार्यवाही :–**

१.मा.श्री.मारुती जगताप,पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती
२.मा.श्री.सचिंद्र शिंदे, अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्रीमती शितल घोगरे, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा, सापळा पथक पोलीस निरीक्षक रमेश पवार, सफौ. शाम भांगे, पोहेकॉ. प्रविण बैरागी, पोना/विनोद लोखंडे, जगदीश पवार, पोकॉ.रंजित व्यवहारे, शैलेश सोनवणे, चानापोकॉ/नितीन शेटे अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा, कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२–२४२५४८ व ९६५७०६६४५५ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी केले आहे.

**(श्रीमती शितल घोगरे)**
पोलीस उपअधिक्षक,
अॅन्टी करप्शन ब्यरो बुलढाणा